**पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - १ यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग,
चेंबुर, मुंबई-४०००७१
दुरध्वनी क्र. **022&25229303**
Email ID-
dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com




**प्रेस नोट**
**दिनांक - १९/८/२०२६**
**(चेंबुर पोलीस ठाणे)**

**<u>दुकानाचे बंद शटर उचकटुन फोडुन चोरी करणाऱ्या ०२ इसमांना चेंबूर पोलीसांनी एका तासाच्याआत अटक करून गुन्हा उघडकिस आणुन चोरीस गेलेली १०० टक्के मालमत्ता हस्तगत केले बाबत</u>**

दि.१९/०८/२०२६ रोजी चेंबुर पोलीस ठाणे येथे फिर्यादी नामे इम्रान हाजी मोहमंद खान वय २८ वर्षे, व्यवसाय-मोबाईल शॉपी, रा.ठी.रूम नं.२०३,शास्त्री नगर, पाडा नं.३, ठककरबाप्पा कॉलनी, चेंबूर, मुंबई ७१ यांनी त्यांच्या आई.के. मोबाईल्स, शॉप नं.२६, द सेंटर बिल्डींग, शेल कॉलनी रोड, चेंबूर, मुंबई ७१ येथील दुकानाचे बंद शटर उचकटवून फोडून प्रवेश करून कोणीतरी अज्ञात इसमाने ०७ मोबाईल फोन किंमत ६७,०००/- रुपये चोरी करुन नेल्याबाबत तक्रार दिल्यावरुन गु.र.क्र.१०८३/२०२६, कलम ३०५(अ),३३४(१),३३१(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्ह्याच्या तपासाबाबत मा. वरिष्ठांकडुन मार्गदर्शन घेवुन, प्राप्त मार्गदर्शनाप्रमाणे नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा गुन्हे प्रकटिकरण पथकाचे पोउपनि केंद्रे व पोलीस पथक परीसरात शोध घेत असताना दोन संशयित इसम हे सर्व्हिस रोड, ईस्टर्न एक्सप्रेस हायवेलगत, सिध्दार्थ कॉलनी, चेंबूर, मुंबई ठिकाणी दिसून आल्याने त्यांना थांबवून विचारपुस केली त्यांनी त्यांचे नाव नामे एकाम आजम शेख उर्फ घोडा वय २७ वर्षे, रा.ठी.कुरेशी नगर, कुर्ला पुर्व, मुंबई व तौहीद इजहार शेख वय २२ वर्षे, रा.ठी.राजीव गांधी नगर झोपडपट्टी, नेहरूनगर, कुर्ला पुर्व, मुंबई त्यांना गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपुस केली असता त्यांनी उडवी उडवीची उत्तरे दिली, त्यांच्यावर संशय बाळगल्याने त्यांची दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या अंगझडतीत नमुद गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता ०७ मोबाईल फोन मिळून आले, सदर गुन्ह्याचा तपास चेंबुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अतिशय जलदगतीने करुन, एका तासाच्या आत गुन्हा उघडकिस आणुन चोरीस गेलेली १०० टक्के मालमत्ता हस्तगत केलेली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ ०१, समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री कलीम शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश केवळे यांचे मार्गदर्शनाखाली चेंबूर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किरण उंडे, पोलीस उप निरीक्षक अरूण केंद्रे (गुन्हे प्रकटकीरण पथक) पो.ह अजित कावळे, पो.ह विनायक चव्हाण, पो शि गणेश सुर्यवंशी यांनी केली आहे.नमुद गुन्हयाचा तपास पोउनि प्रदिप पाटील करीत आहे.

***